INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# लोकशाही शासनव्यवस्थेत निवडणुकांचे महत्व

## (Importance of Elections in a Democratic System of Governance)

**जितेंद्र भारतराव चव्हाण**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र, भारत)
E-mail: patiljbc@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/10.2025-22366654/IRJHIS2510014**

**प्रस्तावना :**

लोकशाही शासन व्यवस्थेचा महत्वाचा भाग म्हणजेच निवडणुका होय. निवडणुकांना लोकशाही शासन व्यवस्थेत अत्यंत महत्वाचे स्थान दिले जाते. लोकशाही शासन व्यवस्थेत जनता हि सार्वभौम असते. राष्ट्र असो कि घटकराज्य तेथील जनता हिच सर्वोच्च सत्ता असते आणि म्हणूनच अंतिम सत्ता हि जनतेकडे सोपविण्याची तरतूद हि लोकशाही शासन व्यवस्थेत केलेली आपणास दिसून येते. जनतेच्या इच्छा आकांक्षांचे प्रतिबिंब हे राज्यकारभारातून स्पष्टपणे जाणवले पाहिजे हिच खऱ्या अर्थाने लोकशाही शासन व्यवस्थेची ओळख समजली जाते. नागरिकांचे प्रतिनिधित्व राज्यकारभारात असावे याकरिता लोकशाही शासन व्यवस्थेत निवडणुकांचा मार्ग अवलंबला जातो. परंतु ह्या निवडणुका ह्या निष्पक्ष आणि पाएदर्शक पद्धतीने पार पडणे हेदेखील लोकशाही च्या यशस्वितेकरिता अत्यंत महत्वाचे आहे; कारण या गोष्टीवरच खऱ्या अर्थाने लोकशाही शासन व्यवस्थेचे यशापयश अवलंबून असते. निवडणुका ह्या पारदर्शक आणि निष्पक्षपणे पार पडणे म्हणजेच निवडणुकांचे आयोजन ज्या यंत्रणेकडून केले जाते ती यंत्रणा हि कोणाच्याही दबावाखाली काम न करता स्वतंत्रपणे त्या यंत्रणेने आपली जबाबदारी पार पाडायला हवी; तरच खऱ्या अर्थाने जनतेचे प्रतिनिधित्व हे राज्यकारभारात दिसून येईल.

लोकशाही हे लोकसंमतीने चालणारे शासन आहे. आधुनिक काळात हि संमती सार्वत्रिक व प्रौढ मतदानाच्या हक्कानुसार होणार्या निवडणुकीच्या मार्गाने होते. मतदानाचा विस्तृत होत गेलेला हक्क लोकशाहीचा पाया खऱ्या अर्थाने मजबूत आणि विस्तृत करीत असतो. आजच्या काळातील लोकशाहीमध्ये सर्वसामान्य लोकांचा सहभाग स्थिर व व्यापक राहण्यासाठी समाजपातळीवर मुल्यांबाबत सहमती, सामाजिक व्यवहार, नियम तसेच

विविध सामाजिक निर्णयाबाबत सहमती यांची आवश्यकता असते. बहुमताने अल्पमताचे म्हणणे ऐकून घेण्याची आणि त्यामधील योग्य मताचे सहमातीमध्ये रुपांतर करण्याची तयारी असेल तर मतविरोधाची सर्वमान्य पद्धती महत्वाची ठरते. आणि म्हूननच या सर्व बाबींवर लोकशाहीचे यशापयश खऱ्या अर्थाने अवलंबून असल्याचे दिसते. बहुमातांचे शासन आणि अल्पमातांचे हक्क यात समतोल साधला गेला तर लोकशाही गतिमान राहण्यास मदत होते. आणि म्हणूनच समाजजीवनातील विशिष्ट मुल्ये आणि आचरण पद्धती जाणीवपूर्वक जपण्याचा आग्रह लोकशाही व्यवस्थेत नेहमीच धरला जात असतो.

**लोकशाहीचा अर्थ :**

लोकशाही हे मूळ इंग्रजी शब्द डेमोक्रसी चे मराठी भाषांतर होय. सामान्य लोकांची सत्ता असा ढोबळमानाने लोकशाहीचा अर्थ काढला जातो. शासनाला लोकांशी जोडणे हा लोकशाहीचा गाभा आहे. हाच धागा पकडून अब्राहम लिंकन यांनी अत्यंत सुंदर आणि सोप्या भाषेत लोकशाहीची व्याख्या केली आहे. ते असे मानतात कि, "लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांकडून चालविले जाणारे शासन म्हणजे लोकशाही होय."

व्यापक अर्थाने लोकशाहीमध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

१. गरीब आणि वंचित लोकांच्या सत्तेची व्यवस्था.

२. असा शासनप्रकार कि ज्यामध्ये लोक प्रत्यक्ष शासन करतात.

३. समान संधी आणि व्यक्तिगत गुणवत्ता यांवर भर दिला जातो.

४. सामाजिक विषमता दूर करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

५. सार्वजिक पदे भरण्याकरिता स्पर्धात्मक पद्धतीने जनमत आजमावण्याची व्यवस्था असते.

६. लोकांचा राजकीय जीवनात सहभाग असूनदेखील जनतेचे हित जोपासणारी शासनव्यवस्था म्हणजे लोकशाही होय.

**लोकशाही शासनव्यवस्थेत निवडणुकांचे महत्व :**

लोकशाही शासनव्यवस्थेत निवडणुकींना अतिशय महत्वाचे स्थान दिले जाते. लोकशाही शासनव्यवस्थेने जनतेचे सार्वभौमत्व मान्य केलेले असते. राज्यातील जनता हीच राज्याची सर्वोच्च सत्ता होय, आणि म्हणूनच लोकशाही शासनव्यवस्थेत राज्याची अंतिम सत्ता हि जनतेच्या हाती सोपविण्याची व्यवस्था केलेली असते. राज्यकारभार जनतेच्या हाती असला पाहिजे आणि राज्यकारभारात जनतेच्या इच्छा-आकांक्षांचे प्रतिबिंब पडले पाहिजे, असे प्रतिपादन लोकशाही व्यवस्थेचे पुरस्कर्ते करतात. आधुनिक काळात अस्तित्वात आलेल्या आकारमाणाने मोठ्या राज्यांच्या स्वरूपामुळे राज्यातील सर्व नागरिकांना राज्यकारभारात सहभागी करून घेणे अशक्य आहे. यावर उपाय म्हणून लोकशाही शासनव्यवस्थेत निवडणुकीच्या मार्गाचा अवलंब केला जातो.

राज्यातील नागरिकांनी निवडणुकीच्या माध्यमातून आपले प्रतिनिधी निवडून द्यावेत आणि या लोकप्रतिनिधींनी जनतेला उत्तरदायी राहून राज्यकारभार करावा अशी व्यवस्था येथे करण्यात आलेली असते.

**• जनतेच्या सार्वभौमत्वाच्या अभिव्यक्तीचे माध्यम :**

निवडणुका ह्या लोकशाही शासनव्यवस्थेतील जनतेच्या सार्वभौम सत्तेच्या अभिव्यक्तीचे अत्यंत महत्त्वाचे माध्यम असतात असे म्हंटले तर चुकीचे ठरणार नाही. निवडणुकांमुळे राज्यातील सर्व नागरिकांना राजकीय प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवता येतो. त्यामुळे राजकीय व्यवस्थेचे आपणही एक महत्त्वाचे घटक आहोत अशी भावना सर्सामान्य जनतेच्या मनात निर्माण होते आणि हेच खरे लोकशाही शासन व्यवस्थेचे फलित आहे. आणि म्हणूनच शासनाला अधिमान्यता हि निवडणुकांच्या माध्यमातून प्राप्त होत असते.

**• निवडणुका मुक्त वातावरणात होणे गरजेचे :**

लोकशाही शासनव्यवस्थेत निवडणुका निष्पक्षपातीपणे आणि मोकळ्या वातावरणात होणे अतिशय महत्वाचे असते. 'पोलॉक' या विचारवंताने असे म्हटले आहे की, "सार्वजनिक निवडणुकांचे आयोजन काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने करण्यात आले नाही, तर केवळ सार्वजनिक सेवांचीच नाचक्की होते असे नाही तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच धोक्यात येते." यावरूनच लोकशाही शासनव्यवस्थेतील निवडणुका ह्या मुक्त व स्वतंत्र वातावरणात होणे किती महत्वाचे असते हे सहजपणे लक्षात येते.

**• स्वतंत्र निवडणूक यंत्रणा :**

लोकशाही शासनव्यवस्थेतील निवडणुका ह्या निष्पक्षपातीपणे व मोकळ्या वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणुकांचे आयोजन करणारी यंत्रणा शासकीय नियंत्रणापासून मुक्त असायला हवी . घटनाकारांनी निष्पक्षपाती व मुक्त वातावरणात निवडणुकांचे आयोजन होणे लोकशाही व्यवस्थेच्या भवितव्याच्या दृष्टीने किती महत्वाचे आहे हे अचूक ओळखले होते; म्हणून त्यांनी प्रत्यक्ष राज्यघटनेतच निवडणुकीसंबंधी काही महत्वाच्या तरतुदी करून ठेवल्या आहेत. भारतीय राज्यघटनेतील निवडणूकविषयक तरतुदी विचारात घेतल्यास घटनाकारांच्या दूरदृष्टीचे आपणास प्रत्यंतर येते.

**• स्वतंत्र व निष्पक्ष निवडणुकीचा अर्थ :**

निवडणुका निष्पक्षपातीपणे आणि मोकळ्या वातावरणात पार पडणे याचा अर्थ असा की, निवडणुकांचे आयोजन करणारी यंत्रणा स्वतंत्र व निष्पक्ष असली पाहिजे. या यंत्रणेवर सरकारचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण असता कामा नये; तसेच तिच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव असता कामा नये. मुक्त व स्वतंत्र वातावरणातील निवडणूक याचा अर्थ असा की, राज्यातील प्रत्येक मतदाराला आपला मतदानाचा हक्क स्वतःच्या इच्छेनुसार आणि निर्भयपणे बजावता येईल अशी परिस्थिती निर्माण केली गेली पाहिजे. राज्यातील निवडणुका निष्पक्षपातीपणे आणि मोकळ्या वातावरणात पार पडल्या तरच मतपेटीच्या माध्यमातून राज्यातील नागरिकांच्या वास्तविक इच्छेची

अभिव्यक्ती झाली असे म्हणता येते.

आणि म्हणूनच लोकशाही शासनव्यवस्थेचा पुरस्कार केलेल्या भारतात खऱ्या अर्थाने लोकशाही रुजवायची असेल, तर निवडणुका ह्या खुल्या व स्वच्छ वातावरणात आणि नियमितपणे होणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण याच निवडणुकांच्या माध्यमातून राज्यकर्ते सत्तेवर येत असतात. भारतीय राज्यघटनेने केंद्र स्तर, राज्य स्तर, आणि स्थानिक स्तर यांसाठी अनुक्रमे केंद्र सरकार, राज्यसरकार, आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांची निर्मिती करून जनतेने निवडून दिलेल्या प्रतीनिधींमार्फत राज्यकारभार चालविण्यास मान्यता दिली आहे.

निवडणुकीच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीपासून स्थानिक पातळीपर्यंत जनतेला राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची आणि आपली मते व्यक्त करण्याची संधी मिळते आणि म्हणूनच अशा निवडणुकीच्या माध्यमातून निवडून आलेली सरकारे सर्वसामान्य लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात परिवर्तन आणि विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असतात. आणि म्हणूनच ह्या सर्व बाबी योग्य रीतीने साध्य करावयाच्या असतील निवडणुका ह्या नियमितपणे आणि घटनेच्या चौकटीत राहून पार पाडणे अत्यंत महत्वाचे असते. भारतीय राज्यघटनेने कलम ३२४ नुसार “निवडणूक आयोग” या स्वायत्त संस्थेकडे निवडणुकांविषयीची सर्व जबाबदारी सोपवलेली आहे.

**संदर्भ :**


1. क्षीरसागर व्हि. व घांगरेकर ची., “शासन आणि राजकारण: भारताच्या संदर्भात” अनिरुद्ध पब्लिशींग हाउस, पूणे.
2. डॉ. देशमुख अलका, “लोकशाहीचे बदलते स्वरूप आणि निवडणुकांचे राजकारण”, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
3. पाटील भारती, “लोकशाही, निवडणुका आणि सुशासन”.
4. प्रा. बंग के.आर.,“महाराष्ट्र शासन व राजकारण”, विद्या बुक्स पब्लिशर्स, छत्रपती संभाजीनगर.
5. डॉ. भोळे भा.ल., “भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण”, पिंपळापुरे पब्लिशर्स कंपनी, नागपूर.